# उल्हासनगर महानगरपालिका

## (अंतर्गत) लेखा परिक्षण अहवाल

सन २०१०-२०११

# उल्हासनगर महानगरपालिका
# लेखा परिक्षण अहवाल
# सन २०१०–२०११

# सामान्य प्रशासन विभाग

(परिच्छेद क्र.१ )

**विषय:– सेवापुस्तकांतील त्रृटी बाबत.**

सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या सेवा पुस्तकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रृटी आढळून आल्यात.

१) गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधी, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून तसे मुळ सेवा पुस्तकात नोंदी घेणे आवश्यक आहे. तशा प्रकारे नोंदी आढळून येत नाही.

२) मराठी भाषा/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण अथवा परिक्षेपासुन सुट दिली असल्यास तशी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेल्या दिसत नाही.

३) अधिकारी–कर्मचारी यांनी शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.५/२००१/२००/३९ दि. ३०/१०/२००२ अन्वये संगणक परिक्षा (MSCIT) उत्तीर्ण होणे अथवा परिक्षेपासुन सुट मिळाली असल्यास, तशी नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु अशा नोंदी सेवा पुस्तकात आढळुन येत नाहीत.

४) मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी–कर्मचारी (SC, ST, NT, OBC) यांचे शासन निर्णयाप्रमाणे संबंधित विभागाकडून जात पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. जर काही कर्मचाऱ्यांची

जात पडताळणी होवून तसे प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झाल्यास, तशी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सामान्य प्रशासन विभाग

(परिच्छेद क्र.२)

विषयः—सेवापुस्तकांतील नोंदीतील अनियमिततेबबात

१) श्री. लक्ष्मण सावळे, गवंडी, यांचे सेवापुस्तक तपासले असता सन १९९९ च्या अर्जित रजा जमा करण्यात आलेल्या नाही. दि. ५/१/१० ते दि. १/२/१० पर्यंत परावर्तीत रजा दाखविण्यात आली आहे. परंतु खर्ची पडतांना दि. ५/१/१० ते दि. १९/१/१० अशी खर्ची पाडण्यात आली आहे. तसेच दि. २०/१/१० ते १/२/१० हया रजेची कार्यालयीन आदेशानुसार नोंद नाही.

२) श्री. बबन साठे, गवंडी यांच्या सेवापुस्तकातील रजा लेखे तपासले असता दि १/१/०४ ते ३०/६/०४ पर्यंत एकुण शिल्लक रजा लिहितांना चुकीची नोंद केलेली आहे. तसेच दि. १/११/२०११ पासून अर्जित व परावर्तीत रजेची नोंद केलेली दिसून येत नाही.

३) सुनिल बाबल्या वावरे, तारतंत्री यांचे सेवापुस्तक तपासले असता सन २००८ चे वार्षिक वेतनवाढ चुकिची आहे. तसेच सेवापुस्तकात वारसाची नोंद नाही.

४) श्री. आधार आनंदा मोरे, तारतंत्री, यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. १६/६/०४ ते दि. २०/६/०४ ची कार्यालयीन आदेशानुसार नोंद नाही. दि.२३/६/२००४ ते ३०/६/०४ या अर्जित रजेची कार्यालयीन आदेशानुसार नोंद आहे. परंतू खर्ची पाडण्यात आलेली नाही. दि. २१/१२/०९ ते ८/१/१० या

परावर्तीत रजेची कार्यालयीन आदेशानुसार नोंद नाही. दि. १/७/०९ ते ३१/१२/०९ या सहा महिन्याच्या अर्जित रजा चुकीच्या आहेत. सन २००७ ची वार्षिक वेतनवाढ चुकीची आहे.

५) श्री. गणपत बी. दोंदे, तारतंत्री यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. २९/७/१० ते दि. ३१/७/१० ही ०३ दिवसांची परावर्तीत रजा खर्ची पाडण्यात आलेली नाही.

६) श्री. ए.जी. माळी, पंपचालक, यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. १७/९/०४ ते २९/९/०४ प्रत्यक्ष परावर्तीत रजा १३ होतात कार्यालयीन आदेशात सुध्दा १३ रजा दाखविल्या आहेत. परंतू खर्ची पाडतांना १७ रजा खर्ची पाडण्यात आल्या आहेत. सन १९९५ ते १९९९ पर्यंतच्या परावर्तीत रजांचा कुठेही उल्लेख नाही.

७) दिनेश भगवानदास रजोरिया, सफाई कामगार, यांचे सेवापुस्तक तपासले असता सन २०१०,२०११,२०१२ या तीनही वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी एकत्र का करण्यात आल्या आहेत? तसेच सन २०१० ते सन २०१२ पर्यंतचा फरक देण्यात आला का? त्याचा खुलासा करावा. श्री. रजोरिया यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

८) श्रीम. मंजील सुरज भंगारीया, सफाई कामगार यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. ११/१/११ ते ३०/६/११ पर्यंतच्या ०५ अर्जित रजा जमा न करताच दि. ११/४/११ ते

दि. १६/५/११ पर्यंतच्या ३६ अर्जित रजा खर्ची पाडण्यात आल्या आहेत. दि १/१/१२ पासून अर्जित व परावर्तीत रजांची नोंद नाही. तसेच दि.२१/०८/११ ते १४/९/११ पर्यंतच्याँ एकुण परावर्ती रजा २५X २ = ५० खर्ची पाडणे गरजेचे असतांना २५ रजा खर्ची पाडण्यात आले आहेत तरी का?

श्रीम. भंगारीया यांच्या नियुक्तीच्या दिनांकाचे मुळ वेतन किती आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चितीची कुठेही उल्लेख नाही. सहाव्या वेतन आयोगाप्रामणेच वेतननिश्चिती करून तुरंत त्याची स्थळप्रत सेवापुस्तकात लावून त्याचा उल्लेख करावा.

श्रीम. भंगारीया यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

९) श्रीम. इंदिरा शामू लोट, सफाई कामगार, यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. १/१/११ ते ३०/६/११ या सहा महिन्याच्या कालावधीत जमा होणाऱ्या परावर्तीत (१०) रजा जमा करण्यात आल्या नाहीत तसेच दि. १/१/१० ते ३१/१२/१० या सहा महिन्यांच्या कालावधीत १० दिवस जास्त परावर्तीत रजा जमा करण्यात आल्या आहेत.

श्रीम. लोट यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

१०) श्रीम. दीपमाला सुनिल डगर, सफाई कमगार, यांचे सेवापुस्तक तपासले असता सेवापुस्तकात नाव बदलल्याची नोंद

दिसून येत नाही. नियुक्तीच्या दिनांकाचे मुळ वेतन किती? त्याचा उल्लेख नाही. सन २०११ पासून अर्जित रजेची मांडणी चुकीची आहे.

श्रीम. डगर यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

११) श्री. जॅकी कन्हेया रौधिया, सफाई कामगार, यांचे सेवापुस्तक तपासले असता सन २०१०,२०११, २०१२ या तिनही वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी एकत्र का देण्यात आल्या आहेत? त्याचा खुलासा करावा. तसेच सन २०१० ते सन २०१२ पर्यंतचा फरक देण्यात आला का? याचा खुलासा करावा.

श्री. रौधिया यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

१२) श्रीम. लता अशोक साठे, सफाई कामगार यांचे सेवापुस्तक तपासले असता सन २०११, २०१२ या तिनही वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी एकत्र का देण्यात आल्या आहेत? त्याचा खुलासा करावा. तसेच सन २०११ ते सन २०१२ पर्यंतचा फरक देण्यात आला का? याचा खुलासा करावा.

श्रीम. साठे यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

१३) श्रीम. कमलेश सुभाष कांगडा, सफाई कामगार यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. १८/२/११ ते ८/४/११ एकुण

५० दिवसांच्या अर्जित रजेची कार्यालयीन आदेशानुसार नोंद नाही. दि. ६/२/११ ते १७/२/११ एकुण १६ दिवसांची परावर्तीत रजेची कार्यालयीन आदेशानुसार नोंद नाही. दि. २/२/११ ते ५/५/११ ची परावर्तीत रजा जमा परावर्तीत रजा मधून खर्ची पाडण्यात आलेली नाही.

श्रीम. कांगडा यांच्या सेवापुस्तकात गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधि, कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान या बाबतचे नामनिर्देशन स्विकृत करून लावण्यात आलेले नाही.

१४) श्री. हरी लक्ष्मण भोंगाडे, सुरक्षा रक्षक यांचे सेवापुस्तक तपासले असता दि. २१/५/११ ते ११/६/११ ही २१ दिवस तसेच दि. ३०/५/१२ ते १७/६/१२ ही १९ दिवस या दोन्ही अर्जित रजांची कार्यालयीन आदेशानुसार नोंद आहे. परंतू खर्ची पाडण्यात आलेल्या नाही तसेच दि. १/५/१२ ते २९/५/१२ ही परावर्तीत रजा खर्ची पाडण्यात आलेली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# वाहन विभाग

(परिच्छेद क्र.३)

विषय:— वाहन विभागाचे लागबुक तपासतांना आढळुन आलेल्या त्रूटीबाबत.

१) (वाहन नं. **M.H-05-F-229 jeep**) :—

दि. १६/१/२०१० रोजी स्पीडो मिटर मशीन सुरूवातीचे अंतर ४२६८० कि.मी. दाखवते व अंतिम अंतर ४२६२५ कि. मी. असे दाखविण्यात आलेले आहे. दर महिन्याच्या शेवटच्या तारखेला वाहनांचा एकुण वापर (कि.मी.) व वाहनाला दिलेल्या इंधनाचा गोषवारा तयार करून सरासरी काढणे आवश्यक असतांना याबाबत गोषवारे तयार करून ते विभाग प्रमुखाने साक्षांकित केलेले दिसून येत नाही.

२) (वाहन नं. **M.H.-05-N-53 slcm**) :—

**अ)** स्पीडो मिटर नुसार शेवटचे दि. ८/२/२००० रोजी कि.मी. ४६२४१ किमी असुन दि. ९/२/२१० रोजी सुरूवातीचे कि.मी ४६२५१ कि.मी. नोंदवण्यात आले तरी १० कि.मी. वाहनांचा वापर कोठे करण्यात आला याचा खुलासा करावा.

**ब)** दर महिन्याच्या शेवटच्या तारखेला वाहनांचा एकुण वापर व वाहनांना दिलेल्या इंधनांचा (कि.मी.) गोषवारा तयार करण्यात आलेला आहे. परंतु विभाग प्रमुखाने साक्षांकित केलेला दिसून येत नाही.

**क)** वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव पदनाम यांची नोंद लॉग बुक मध्ये दिसून येत नाही.

# वाहन विभाग

(परिच्छेद क्र.४ )

विषय:— **वाहन** विभागाचे लॉगबुक तपासतांना आढळुन आलेल्या त्रृटीबाबत.

१) सन २०१०—२०११ चे वाहन विभागाचे लॉगबुक तपासले असता लॉगबुक मधिल रकाना क्र.०८(धावलेले कि.मि.) भरलेला नाही. त्यामुळे गाडीचे सरासरी कि.मी. अंतर समजत नाही. तसेच लॉगबुक तपासले असता लॉगबुकवर गाडीचा प्रकार कोणता तो लिहिलेला नाही. त्यामुळे गाडी कोणती आहे ते समजत नाही.

२) मोटार घरातून वाहन गेल्याचे वेळ व वाहन मोटार घरात आल्याची वेळ नोंद केलेली नाही.

३) तसेच वाहन वापर करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे नाव, पदनाम याची नोंद लॉगबुकात केलेली नाही.

४) डिझेल समवेत लागणारे इंधन (Oil)भरल्याची नोंद दिसून येत नाही.

५) लॉगबुक तपासले असता दर महिन्याच्या शेवटच्या तारखेला सदर वाहनाचा एकुण वापर (कि.मी.) व वाहनांचा इंधनांचा गोषवारा तयार करून सरासरी( Average) **काढणे** आवश्यक असतांना त्याबाबत गोषवारा तयार करण्यात आलेला दिसून येत नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.५)

**विषय :- स्थावर मालमत्तेची नोंदवहीबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची स्थावर मालमत्ता नोंदवही तपासतांना त्यात जोते क्षेत्रफळ व घनफळाचा उल्लेख कोणत्याही मालमत्तेसंबंधी केलेला नाही. तसेच मालमत्तेचे वर्णन आणि जागा यांच्या स्वरूपाबद्दल नोंद घेतलेली नाही. स्थावर मालमत्ता नोंदवही ही मुख्य व अति महत्वपूर्ण नोंदवही असून त्यात अपूर्ण नोंदी ठेवणे ही गंभीर बाब आहे. तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.६)

**विषय :— मालमत्ता विभागाची स्थावर मालमत्तेची नोंदवहीबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची स्थावर मालमत्ता नोंदवही तपासतांना स्थावर मालमत्तांची नोंद केल्यानंतर त्यावर उप—आयुक्त किंवा शहर अभियंता यांच्या स्वाक्ष—या रकाना क्रमांक १५ मध्ये घेणे आवश्यक असतांना कोणत्याही नोंदीनंतर सदर स्वाक्ष—या आढळून आल्या नाहीत. त्यामुळे सदर स्थावर मालमत्ता नोंदवही ही मूळ प्रतीची नसून दुय्यम प्रतीची वाटते. तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.७ )

## विषय :- स्थावर मालमत्तेची नोंदवहीबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची स्थावर मालमत्ता नोंदवही तपासतांना मालमत्तेचा अनुक्रमांक ९८ ते १०५ पर्यंतच्या नोंदी या पेन्सिलीने नोंदविलेल्या आहेत. त्यात फक्त मालमत्तेचे वर्णन नमूद केलेले आहे. उर्वरीत सर्व रकाने रिकामे ठेवण्यात आले आहेत.

तरी पेन्सिलने फक्त मालमत्तेचे वर्णन व उर्वरीत सर्व रकाने रिकामे ठेवण्याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.८)

**विषय :— स्थावर मालमत्तेची नोंदवहीबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची स्थावर मालमत्ता नोंदवही तपासतांना मालमत्तेचा अनुक्रमांक ८१ ते ९६ पर्यंत फक्त जकात नाका एवढीच नोंद केलेली असून उर्वरीत सर्व रकाने रिकामे ठेवण्यात आले आहेत. सदर रकाने रिकामे ठेवण्याबाबतचे लेखी स्पष्टीकरण लेखा परिक्षण विभागास सादर करून प्रत्यक्ष अनुपालन सादर करावे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.९)

**विषय :— स्थावर मालमत्तेची नोंदवहीबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची स्थावर लमत्ता नोंदवही तपासतांना मालमत्ता अनुक्रमांक ६ वर गेस्ट ऊसची नोंद करण्यात आली आहे. परंतु सदर गेस्ट हाऊस कोणत्या योजनासाठी व कोणाकडून वापरण्यात येत आहे त्याचा उल्लेख केलेला ाही. तसेच ज्या आदेशानुसार मालमत्ता संपादन करण्यात आली आहे कंवा बांधण्यात आली आहे त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही. तसेच इमारतीचे स्वरूप, मजल्यांची संख्या, जोते क्षेत्र, नफळ याची नोंद करण्यात आली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# अतिक्रमण विभाग

(परिच्छेद क्र.१०)

**विषय :– अनाधिकृत बांधकाम निष्कासीत करताना होणारा खर्च वसूल न केल्याबाबत.**

प्रभाग समिती क्रमांक १ व २ चे लेखा परिक्षण करतांना असे आढळून आले की, प्रभाग समिती क्रमांक १ या प्रभाग समितीच्या हद्दीत वित्तीय वर्ष २०१०—२०११ या कालावधीत अनाधिकृत बांधकाम नोंद रजिस्टरनुसार अनेक अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आलेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७८(२) व ४७९ अन्वये अनधिकृत बांधकाम कर्त्याकडून अनाधिकृत बांधकाम निष्कासीत करतांना होणारा खर्च वसूल करणे आवश्यक असतांना आपल्या समितीकडून एकही पैसा वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे फार मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. तरी सदर वरील प्रकरणात वसूली कां करण्यात आलेली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# अतिक्रमण विभाग

रिच्छेद क्र.११)

**विषय :— अनाधिकृत बांधकाम निष्कासीत करताना होणारा खर्च वसूल न केल्याबाबत.**

प्रभाग समिती क्रमांक ३ व ४ चे लेखा परिक्षण करतांना असे आढळून आले की, प्रभाग समिती क्रमांक ४ या प्रभाग समितीच्या हद्दीत वित्तीय वर्ष २०१०—२०११ या कालावधीत अनाधिकृत बांधकाम नोंद रजिस्टरनुसार अनेक अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आलेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७८(२) व ४७९ अन्वये अनधिकृत बांधकाम कर्त्याकडून अनाधिकृत बांधकाम निष्कासीत करतांना होणारा खर्च वसूल करणे आवश्यक असतांना आपल्या समितीकडून एकही पैसा वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे फार मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. तरी सदर वरील प्रकरणात वसूली कां करण्यात आलेली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# वैद्यकीय आरोग्य विभाग

रिच्छेद क्र.१३)

**विषय :— वैद्यकीय आरोग्य विभागाची सन २०१०—११ च्या साठा नोंदवहीत आढळून आलेल्या त्रुटींबाबत.**

वैद्यकीय आरोग्य विभागाची सन २०१०—११ ची औषध साठा नोंदवही तपासली असतांना खालील त्रुटी आढळून आल्या.

साठा नोंदवहीत एकूण ३९ प्रकारची औषधे खरेदी करण्यात आलेली असून त्यांचे वाटप शहरी स्वास्थ केंद्र क्रमांक १ ते ६ व महापालिकेच्या दवाखान्यास केलेले दर्शविण्यात आलेले आहे. परंतू सदर साठा नोंदवहीत वस्तू देणा—या अधिका—याची सही व वस्तू घेणा—या अधिका—याची सही या रकान्यात कोणाचीही स्वाक्षरी नसल्याचे आढळून आले. सदर बाब ही अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याने याबाबत लेखा परिक्षण विभागास शहरी स्वास्थ्य केंद्र क्रमांक १ ते ६ व महापालिकेच्या दवाखान्याची सन २०१०—११ ची साठा नोंदवहीसह याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# आरोग्य विभाग

(च्छेद क्र.१४)

**विषय :— सन २०१०—११ मधील डिझेल व पेट्रोल धुरी करणाच्या डायऱ्यातील अनियमितताबाबत.**

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१०—११ चे लेखा परिक्षण करतांना असे आढळून आले की, सन २०१०—११ मध्ये धुरी करणासाठी घेतलेले पेट्रोल व डिझेल याबाबत प्रभागवार ठेवण्यात आलेल्या डाय—यांत अनियमितता आढळून आली. काही प्रभागाच्या फक्त एका महिन्यासाठीच तयार करण्यात आल्याचे दिसून आले. ज्या दाखविण्यात आल्या त्यात कोणत्या तारखेस पेट्रोल व डिझेल प्राप्त झाले व ते कशाप्रकारे धुरीकरणासाठी वापरण्यात आले तसेच ते कोणत्या परिसरात करण्यात आले याचा उल्लेख नसल्याने कुठलाही ताळमेळ लागत नाही. सदर बाब ही गंभीर स्वरूपाची आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

## आरोग्य विभाग

रिच्छेद क्र.१५)

**विषय :— निकामी जडवस्तू संग्राहाची विल्हेवाट लावणेबाबत.**

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१०—११ चे लेखा परिक्षण करतांना असे आढळून आले की, आरोग्य विभागासाठी दरवर्षी मोठया प्रमाणात जड वस्तू संग्राहाची (फावडे, घमेले, लोखंडी हातगाडया, स्प्रे पंप, फॉगींग मशिन्स) इत्यादी खरेदी करण्यात येते. खराब अथवा निकामी झालेल्या वस्तू सर्व स्वच्छता निरीक्षकांकडून पुन्हा एकत्रित करून त्यांची लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया ब—याच वर्षापासून दिसून येत नाही. आतापर्यंत खराब वा निकामी झालेले साहित्य कुठेच जमा केलेले दिसून येत नाही. त्यामुळे सदर साहित्यांचा लिलाव न केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

## आरोग्य विभाग

च्छेद क्र.१६)

**विषय :— जडवस्तू नोंदवही न ठेवल्याबाबत.**

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१०—११ चे लेखा परिक्षण करतांना असे आढळून आले की, सार्वजनिक आरोग्य विभाग प्रत्येक वर्षी मोठया प्रमाणात जडवस्तू संग्राहाची (फावडे, घमेले, हातगाडया, स्प्रे पंप, फॉगींग मशिन्स) इत्यादींची खरेदी करते. परंतु सदर साहित्याची नोंद ही नमूना कमांक ११६ या साठा नोंदवहीत होते. परंतू सदर नोंदवहीत साहित्याची आल्याची नोंद व आलेल्या साहित्याची वाटपाची नोंद एवढेच रकाने असल्याने ती अपूर्ण आहे. त्यामुळे सदर साहित्याची नोंद ही मुंबई प्रांतिक अधिनियमानुसार जडवस्तू नोंदवहीत घेणे अत्यावश्यक आहे. तरी सदर बाब ही गंभीर स्वरूपाची आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# नागरी सुविधा केंद्र

(परिच्छेद क्र.१७)

**विषय :—** महानगरपालिकेच्या एकूण खरेदी करण्यात आलेल्या संगणकांची संख्या तसेच निकामी (Dead) झालेल्या संगणकांची एकूण संख्या व त्यांची केलेली विक्रीबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेत आतापर्यंत विविध कंपन्यांचे एकूण किती संगणक खरेदी करण्यात आले आहेत व त्यापैकी एकूण किती संगणक निकामी (Dead) झालेले आहेत. तसेच निकामी (Dead) झालेल्या संगणकांची कशा प्रकारे विक्री करण्यात आली.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# नागरी सुविधा केंद्र

(परिच्छेद क्र.१८)

**विषय :— विविध प्रकारचे कार्टेजेस, टोनर्स यांची खरेदी अथवा रिफीलींग निविदेद्वारा न करता किरकोळ स्वरूपात खरेदी व रिफीलींग केल्याबाबत.**

नागरी सुविधा केंद्राचे सन २०१०—११ चे लेखा परिक्षण करतांना असे आढळून आले की, नागरी सुविधा केंद्राने विविध प्रकारचे कार्टेजेस, टोनर्स यांची खरेदी व रिफीलींग ही किरकोळ स्वरूपात सतत करण्यात आली आहे. जर खरेदी अथवा रिफीलींग जास्त प्रमाणात होत आहे तरी सदर साहित्याची खरेदी अथवा रिफीलींग हे निविदेद्वारे करणे उचित ठरले असते. त्यामुळे स्पर्धात्मक दर मिळून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळू शकले असते.

त्याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका